18-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/17/2025 11:06 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



प्रियकरानेच चिरला प्रेयसीचा गळा पान ३ वर



पहिल्या सामन्यात जसप्रीत बुमराहला विश्रांती ? पान ४ वर

वेर्णा, बुधवार, १८ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 286 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 18 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# शरण या !- खोमेनी यांना ट्रम्प यांची धमकी

## इराणने 'बिनशर्त आत्मसमर्पण' करण्याचा ट्रम्प यांचा पुनरुच्चार | इस्रायलवर हल्ले सुरूच

**वॉशिंग्टन, दि. १७ :**

**अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या सर्वोच्च नेत्याविरोधात कारवाई करण्यास सध्या तरी नकार दिला आहे. ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये यांनी म्हटले आहे की, अमेरिकेच्या सशस्त्र दलांना अली खामेनी यांना ठार करण्याची क्षमता आहे, मात्र अशा कारवाईमुळे अमेरिकन नागरिक आणि सैनिकांच्या सुरक्षेला धोका पोहोचू नये म्हणून ती पावले उचलली जात नाहीत.**

खोमेनी हा एक सोपा लक्ष्य आहे, आम्हाला माहिती आहे की तो कुठे लपलेला आहे. पण आम्ही त्याला संपवणार नाही . किमान सध्या तरी नाही. कारण आम्हाला आमच्या नागरिकांवर आणि सैनिकांवर होणाऱ्या संभाव्य हल्ल्यांचा बदला नको आहे, असे ट्रम्प यांनी नमूद केले.

ट्रम्प यांनी पुढे म्हटले की , आमचा संयम आता संपत चालला आहे. आम्हाला युद्ध नकोय, पण जर गरज भासली तर कारवाई अटळ आहे. इराणने 'बिनशर्त आत्मसमर्पण' करावे, अशी मागणी त्यांनी जोरदारपणे केली.

दरम्यान, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष पाचव्या दिवशीही सुरूच असून, दोन्ही देश एकमेकांवर क्षेपणास्त्र हल्ले करत आहेत. इराणमध्ये आतापर्यंत किमान २२४ नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे, तर इस्रायलमध्ये २४ जणांचा मृत्यू झाला आहे.

इस्रायलने इराणच्या तीन प्रमुख अणुविज्ञान केंद्रांना लक्ष्य केले असून, या हल्ल्यांमुळे त्यांच्या अण्वस्त्र कार्यक्रमावर मोठा परिणाम झाल्याचा दावा इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी केला आहे. हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा अद्याप स्पष्ट झालेला नाही.

ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये दावा केला की, आता आमचे इराणच्या हवाई सीमांवर पूर्ण नियंत्रण आहे. त्यांनी असेही म्हटले की, इराणकडे काही संरक्षणात्मक साधने होती, पण ती अमेरिकेच्या यंत्रणांच्या तुलनेत फिकी आहेत. आमच्या तंत्रज्ञानापुढे कोणीही टिकू शकत नाही.



इराण–इस्रायल संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात पेट्रोल आणि कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. मंगळवारी यूएस ऑइल फ्युचर्समध्ये २.९ टक्के वाढ होऊन दर प्रती बॅरल ७३.९० डॉलर पर्यंत पोहोचला. गेल्या आठवड्यात इराणवर झालेल्या इस्रायली हल्ल्यांनंतर आठवडाभरातच किमतींमध्ये १३ टक्के वाढ झाली आहे, जी ऑक्टोबर २०२२ नंतरची सर्वाधिक वाढ आहे.

एएएनुसार, मंगळवारी अमेरिकेत नियमित पेट्रोलची सरासरी किंमत ३.१७ डॉलर प्रति गॅलन झाली. विश्लेषकांनी इशारा दिला आहे की, इराणकडून तेल निर्यातीत अडथळा आल्यास जागतिक पुरवठ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनीकडे व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे, कारण हा जलमार्ग पर्शियन आखातातील तेलसाठ्याला जागतिक बाजारपेठांशी जोडतो. सोमवारी याच मार्गावर एका तेल टँकरला झालेल्या टक्करप्रसंगाने या जलमार्गाचे धोरणात्मक महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

जी७ शिखर परिषदेतून लवकर बाहेर पडल्यावर ट्रम्प यांनी स्पष्ट केले की ते केवळ युद्धविरामासाठी नव्हे, तर संघर्षाचा खरा शेवट शोधण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांनी दावा केला की, खूप मोठ्या स्तरावर काहीतरी सुरू आहे, आणि इराणी नागरिकांनी तेहरान सोडण्याचा विचार करावा, असा इशाराही त्यांनी दिला आहे.त्याचबरोबर, इराण अण्वस्त्र कार्यक्रमाच्या स्थितीबाबत अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांच्या अंदाजावरही ट्रम्प यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राष्ट्रपती कार्यालयाच्या सिच्युएशन रूममध्ये त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षा पथकाशी त्यांनी आज बैठक घेतली आहे.

इस्रायलच्या दक्षिण भागात सायरन वाजवले गेले असून, मृत सागर आणि दक्षिणेकडील भागातील नागरिकांना सुरक्षित आश्रय घेण्याचा इशारा दिला गेला आहे. इस्रायली संरक्षण दलाने जाहीर केले की, इराणकडून प्रक्षिप्त केलेली क्षेपणास्त्रे त्यांनी ओळखली असून, संरक्षण यंत्रणा सक्रिय आहेत.

### ११० भारतीय विद्यार्थ्यांना तेहरानमधून बाहेर

**इस्रायल आणि इराणमधील तणाव वाढत असताना, ११० भारतीय विद्यार्थ्यांना तेहरानमधून बाहेर काढण्यात आले आहे आणि ते आर्मेनियामध्ये सीमा ओलांडली आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी सांगितले.एका निवेदनात, मंत्रालयाने म्हटले आहे की भारतीय दूतावास समुदायाशी सतत संपर्कात आहे आणि सर्व शक्य ती मदत देण्याचा त्यांचा उद्देश आहे.जम्मू आणि काश्मीर विद्यार्थी संघटनेच्या मते, उर्मिया मेडिकल युनिव्हर्सिटीमधील ११० भारतीय विद्यार्थी, त्यापैकी ९० विद्यार्थी काश्मीर खोऱ्यातील आहेत, सुरक्षितपणे आर्मेनियामध्ये सीमा ओलांडून गेले आहेत.सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ' एक्स' वरील एका पोस्टमध्ये, इराणमधील भारतीय दूतावासाने म्हटले आहे की: सर्व भारतीय नागरिक आणि पीआयओ जे स्वतःच्या संसाधनांचा वापर करून तेहरानमधून बाहेर पडू शकतात त्यांना शहराबाहेर सुरक्षित ठिकाणी जाण्याचा सल्ला देण्यात येत आहे.एका वेगळ्या निवेदनात, परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की इराण आणि इस्रायलमधील चालू घडामोडी लक्षात घेता मंत्रालयात २४/७ नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.**

## निवडक

### इस्रायलचा इराणी टीव्ही स्टुडिओवर हल्ला

**तेहरान, दि. १७ :** इस्रायलने इराणच्या सरकारी टीव्ही स्टेशनवर हल्ला केला. हा हल्ला लाईव्ह कार्यक्रमादरम्यान झाला. त्यामुळे टीव्ही स्टेशनला त्यांचे प्रसारण थांबवावे लागले. या घटनेचा भयावह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये स्फोटाचा आवाज ऐकू येतो. स्टुडिओमध्ये धूर आणि धूळ पसरली. त्यामुळे अँकर आणि क्रू मेंबर्सना कॅमेरा सोडून बाहेर पळावे लागले. त्यावेळी लोक 'अल्ला-हू-अकबर'च्या घोषणा देत होते.

इस्रायलने हल्ल्याआधी तेहरानमधील लोकांना इशारा दिला होता. टीव्ही स्टुडिओ ज्या भागात आहे, तो भाग रिकामा करण्यास सांगितले होते.

सोमवारी इराणने इस्रायलवर मिसाइल आणि ड्रोनने हल्ला केला होता. त्यामुळे मोठे नुकसान झाले. इराणच्या हल्ल्यामुळे इस्रायलमध्ये धोक्याचे सायरन वाजू लागले. हल्ल्यात आठ नागरिक मारले गेले आणि अनेक जखमी झाले, असे इमर्जन्सी सेवांनी सांगितले.

इस्रायल इराणवर आणखी हल्ले करणार आहे. इस्रायलच्या सैन्याने तेहरानमधील काही भागांतील लोकांना घरं सोडण्यास सांगितले आहे. इराणने सोमवारी सकाळी इस्रायलवर मिसाइलने हल्ला केला. त्यात पाच लोक मारले गेले.

इस्रायलने दावा केला आहे की, त्यांनी तेहरानवर हवेत नियंत्रण मिळवले आहे. ते कोणत्याही धोक्याशिवाय इराणच्या राजधानीवरून उड्डाण करू शकतात. त्यात आज त्यांनी हल्ला केला आहे.

इस्रायलने १२० ईरानी मिसाइल नष्ट केले.

### अमेरिकेची विमानवाहू युद्धनौका मध्य आशियाकडे रवाना

**वॉशिंग्टन, दि. १७ :** इराण–इस्रायल संघर्ष पेटलेला असताना अमेरिकन नौदलाचं विमानवाहू जहाज यूएसएस निमित्ज सोमवारी सकाळी दक्षिण चिनी समुद्रातून पश्चिमेच्या दिशेनं रवाना झालं आहे. शिप ट्रॅकिंग वेबसाईट मरिन ट्रॅफिक यांनी ही माहिती दिलेली आहे. व्हिएतनामच्या डानांग शहरातील पोर्ट कॉलमध्ये निमित्ज कॅरिअरसाठी एका सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. पण तो सोहळा रद्द करण्यात आलेला आहे. इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष पेटलेला असताना निमित्ज कॅरिअर मध्य आशियाच्या दिशेनं रवाना झालेलं आहे.

निमित्ज कॅरिअर २० जूनला डानांग शहरात पोहोचणार होतं. त्या दिवशी तिथे औपचारिक स्वागत सोहळ्याचं आयोजन करण्यात आलेलं होतं. पण आता हा सोहळा रद्द करण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्यानं दिली आहे. अमेरिकन दूतावासानं याबद्दलची माहिती दिलेली आहे.

रॉयटर्सनंदेखील सुत्रांच्या हवाल्यानं याबद्दल वृत्त दिलेलं आहे.

रॉयटर्सनं यासंदर्भात अमेरिकन दूतावासाशी संपर्क साधला. पण त्यांनी यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. यूएसएस निमित्ज कॅरिअर स्ट्राईक ग्रुपनं गेल्या आठवड्यात दक्षिण चिनी समुद्रात सागरी सुरक्षा संचालन केलं होतं. हे ऑपरेशन अमेरिकन नौदलाच्या इंडो–पॅसेफिक परिसरातील नियमित उपस्थितीशी संबंधित होतं. यूएस पॅसेफिक फ्लीटच्या कमांडरच्या संकेतस्थळावर ही माहिती देण्यात आलेली आहे.

### भयंकर! जमिनीच्या वादातून १००हून अधिकांची हत्या

**नवी दिल्ली, दि. १६ :** जमिनीवरुन झालेल्या वादातून १०० पेक्षा अधिक जणांची हत्या करण्यात आली. मानवाधिकारांसाठी काम करणाऱ्या ॲमनेस्टी इंटरनॅशनल नायजेरियानं याबद्दलची माहिती दिली आहे. बेन्यू राज्यातील येलेवाटा गावात बंदूकधाऱ्यांनी अंदाधुंद गोळीबार केला आणि अनेकांना जिवंत पेटवून दिलं. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे.

१३ जूनच्या रात्री उशिरा ही घटना घडली. त्यानंतर १४ जूनच्या पहाटेपर्यंत गोळीबार सुरु होता. या हल्ल्यानंतर अनेक जण बेपत्ता आहेत. जखमींची संख्या मोठी आहे. त्यांना पुरेशा वैद्यकीय सुविधादेखील मिळत नसल्याची माहिती आहे.

## बाल भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी सीएसआर निधी वापरण्याचा उच्च न्यायालयाचा सल्ला

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७ :** उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने राज्यातील रस्त्यावर भीक मागणाऱ्या मुलांच्या पुनर्वसनासाठी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर ) निधीचा वापर करण्याच्या शक्यतांवर गंभीर विचार करण्याचे निर्देश गोवा सरकारला दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने ही कारवाई ॲडव्होकेट मोझेस पिंटो यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान केली.

ॲड. पिंटो यांनी न्यायालयासमोर सादर केलेल्या सूचना बाल हक्क, पुनर्वसन आणि शैक्षणिक पुनर्प्रवेश यांसारख्या मुद्द्यांवर केंद्रित होत्या. या सूचनांमध्ये सीएसआर निधी वापरून बालकल्याणासाठी समर्पित निधी स्थापन करणे, मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था व संस्थांची यादी तयार करणे, तसेच मुलांच्या तातडीच्या मदतीसाठी मोबाईल रेस्क्यू टीम्स, रेस्क्यू व्हॅन्स, तात्पुरती निवासस्थाने, वैद्यकीय तपासणी यंत्रणा आणि मानसशास्त्रीय समुपदेशन सेवा उभारण्याचा समावेश आहे.

तसेच, या मुलांना मुख्य प्रवाहातील शिक्षणात समाविष्ट करण्यासाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम आणि १४ वर्षांवरील मुलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाचे मॉड्यूल तयार करण्याचेही सुचवले गेले आहे. लोकांनी रस्त्यावर मुलांना भीक देण्यापासून परावृत्त व्हावे आणि चाइल्डलाइन १०९८ किंवा तत्सम यंत्रणांमार्फत बाल शोषणाच्या तक्रारी नोंदवाव्यात यासाठी जनजागृती मोहिमा राबवण्याची शिफारस देखील करण्यात आली आहे.

न्यायालयाने या सूचनांना रेकॉर्डवर घेतले असून, राज्य सरकारकडून त्यावर स्पष्ट भूमिका सादर करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. कोणत्या सूचना प्रत्यक्षात व्यवहार्य आहेत आणि त्यांची अंमलबजावणी सरकार संपूर्णपणे किंवा आंशिक स्वरूपात करू शकते, हे स्पष्ट करण्यास सांगण्यात आले आहे.

त्याचबरोबर, खंडपीठाने अतिरिक्त सरकारी वकिलांना आदेश दिले की त्यांनी महिला आणि बाल विकास विभाग, गोवा राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, शिक्षण संचालनालय आणि वाहतूक संचालनालय यांना या सूचनांची माहिती द्यावी. हे सर्व संबंधित विभाग या मुद्द्यावर सरकारला सल्ला देऊ शकतात, असेही नमूद करण्यात आले.या प्रकरणातील पुढील सुनावणी आता ३० जून रोजी होणार आहे.

## भाजपविरोधात लढाईसाठी विरोधकांचे ऐक्य आवश्यक – सरदेसाई

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७ :** गोवा फॉरवर्ड पक्षाचे अध्यक्ष आणि फातोर्डा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजय सरदेसाई यांनी स्पष्ट केले आहे की, आगामी वर्षभर ते कोणत्याही वैयक्तिक राजकीय हितापलीकडे जाऊन गोव्यातील जनतेच्या समस्या समजून घेण्यासाठी आणि सत्ताधारी भाजपविरोधात एक व्यापक पर्याय उभा करण्यासाठी काम करणार आहेत.

मंगळवारी हेराल्ड मिडियाशी संवाद साधताना सरदेसाई म्हणाले, काहीजण मला काँग्रेसमध्ये जाण्याचा सल्ला देतात, पण माझ्यासाठी ती स्वतःची ओळख सोडून देण्यासारखी गोष्ट आहे. हे सुचवणेही मला अपमानास्पद वाटते. मात्र, मी एवढे नक्की सांगू शकतो की गोव्याचा भविष्यकाळ वाचवण्यासाठी सर्व शक्य पर्याय खुले ठेवले जातील . अगदी कल्पनेपलीकडील पर्यायही.

गोव्याला पुन्हा गोवा बनवण्यासाठी स्पष्ट दृष्टी, समजूतदार मन आणि काही गोष्टींचा त्याग करण्याची तयारी हवी, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

सरदेसाई यांनी यावर भर दिला की, लोकांपर्यंत जाण्याचा माझा उद्देश कोणताही राजकीय अजेंडा राबवणे नाही. माझा हेतू त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि गोवा–केंद्रित उपाय शोधणे हाच आहे. हे काम फक्त व्यापक ऐक्य आणि सर्व गोव्याच्या हितासाठी काम करणाऱ्या शक्तींना एकत्र करूनच साध्य होईल.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा दाखला देत त्यांनी स्पष्ट केले की, लोकांनी जर एकत्र येण्याचा निर्णय घेतला, तर भाजपसारख्या सत्ताधारी पक्षालाही पराभूत करता येते. प्रत्येक निवडणूक एक शिकवण घेऊन येते. गोव्यातील लोकांनी इंडिया आघाडीसाठी ऐक्य घडवले आणि काँग्रेसने दक्षिण गोव्याची लोकसभा जागा राखली. मात्र काँग्रेसकडून पुढाकार घेतला गेला नसल्याने आता लोकांना वाटते की मीच पुढाकार घ्यावा, असे सरदेसाई यांनी सांगितले.

विरोधकांमध्ये ऐक्य घडवणे ही काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. भाजपविरोधात पर्याय उभा करायचा असेल, तर कोणी तरी जाऊन लोकांचे ऐकले पाहिजे, संवाद साधला पाहिजे आणि त्या आधारे भक्कम पर्याय घडवून आणला पाहिजे, असे ते म्हणाले.

भाजपच्या सत्तेतील काही लोक सुद्धा सध्याच्या परिस्थितीबाबत नाराजी व्यक्त करत असल्याचे नमूद करत सरदेसाई म्हणाले की , भाजपचे काँग्रेसीकरण झाले असल्याची तक्रार अनेकजण करत आहेत, असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी काँग्रेसमधून भाजपमध्ये गेलेल्या नेत्यांना लगावला.

## म्हादईचा प्रश्न राजकीय नव्हे, तर पर्यावरणाचा– कॅ धोंड

■ *टीम दैनिक हेराल्ड*




**फोंडा, दि. १७ :** म्हादई नदी वळविण्याचा मुद्दा केवळ गोवा किंवा कर्नाटकापुरता मर्यादित नसून, तो संपूर्ण पश्चिम किनारपट्टीच्या पर्यावरणीय संतुलनावर परिणाम करणारा आहे, असे स्पष्ट प्रतिपादन पर्यावरण अभ्यासक कॅप्टन नितीन धोंड यांनी केले. ते फोंडा येथे झालेल्या 'सेव्ह म्हादई, सेव्ह गोवा' या जनजागृती सभेत बोलत होते. या वेळी पर्यावरणतज्ज्ञ मयुरेश खवटे, निर्मल कुलकर्णी, प्रजल साखरदांडे, तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कॅप्टन धोंड म्हणाले की , म्हादई वळविण्याचा धोका हा सीमांच्या पलिकडचा आहे. गोव्यासह कर्नाटक आणि महाराष्ट्रालाही याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. समुद्राकडे वाहणारे पाणी अडवल्यास गोव्यातील खारटपणा वाढेल, विहिरींचे पाणी खारट होईल आणि मासेमारीवर संकट येईल. परिणामी गोव्याचे पर्यटन, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यावर मोठा परिणाम होईल.

ते पुढे म्हणाले, हा विषय केवळ राजकीय नाही, तर मोठ्या व्यावसायिक हितसंबंधांचा आहे. म्हादईचे पाणी मलप्रबा नदीकडे वळवण्यामागे कर्नाटकातील ऊस उत्पादन व साखर कारखान्यांची वाढती गरज आहे. सध्या ९ साखर कारखाने कार्यरत असून आणखी ९ प्रस्तावित आहेत. पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली ही पाणीवळवण योजना पर्यावरणीय नियम बायपास करून पुढे नेली जात आहे. ही लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकणारी यंत्रणा असून आपण याला विरोध करायलाच हवा.

धोंड यांनी कर्नाटकाच्या त्या दाव्यालाही खोडून काढले की गोवा म्हादईचे पाणी समुद्रात वाया घालवतो. म्हादईच्या उपनद्या अनेक धबधब्यांमधून गोव्यात प्रवेश करतात. हे पाणी समुद्रात पोचल्यावर पोषक तत्त्वांसह सागरी शैवालाची वाढ घडवते, जे सूक्ष्मजीव व मासे यांच्यासाठी अत्यावश्यक आहे,असे ते म्हणाले. म्हादईवरील तीन प्रस्तावित धरणांमुळे गोवा व कर्नाटकातील जैवविविधतेने नटलेली अभयारण्ये धोक्यात येतील. या भागाला गोव्याचे चेरापुंजी' म्हणून ओळखले जाते. इथे पावसाची विशिष्ट पद्धत आहे. जर म्हादईचे पाणी रोखले गेले, तर हे संपूर्ण परिसंस्थाच कोसळेल, असा गंभीर इशारा त्यांनी दिला.

म्हादईचा पाण्याचा प्रश्न सध्या सर्वोच्च न्यायालयात विचाराधीन असून, निसर्गाच्या विरुद्ध कोणताही प्रयोग अपायकारक ठरेल, असा इशारा देताना धोंड म्हणाले, नद्यांचे स्वतःचे अस्तित्व, परिसंस्था आणि महत्त्व आहे. पाण्याचा प्रश्न जीवनपूर्वकालीन आहे, त्यावर माणसाने नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करू नये.कर्नाटक सरकारने जल आयोगाची मंजुरी घेऊन वळवण मंजूर करून घेतले असून, या निर्णयाला आव्हान देण्याची गरज आहे. बेळगाव आणि खानापूरमधील नागरिकांनीही याविरोधात आंदोलन सुरू केले आहे. गोव्यात जागरूकता वाढवणे ही काळाची गरज आहे. हे कोणत्याही पक्षाच्या पारड्यातील नव्हे, तर निसर्ग वाचवण्यासाठीचे अपराजकीय आंदोलन आहे असे धोंड यांनी स्पष्ट केले

पर्यावरणतज्ज्ञ प्रजल साखरदांडे यांनी म्हटले की, गोवेकर गेली अनेक दशके म्हादईच्या वळवणाविरोधात लढा देत आहेत. २०१९ मध्ये हा लढा अधिक तीव्र झाला. आजही केंद्रीय जल आयोगाच्या वळवण मंजुरीला कायदेशीर आव्हान देणे आवश्यक आहे. कळसा नाल्याचे वळवणे आधीच पूर्ण झाले आहे. आता भंडुरा नाल्यावर लक्ष केंद्रित करून त्याचे वळवणे थांबवण्याची गरज आहे,असे त्यांनी स्पष्ट केले.

## म्हापशात फळे पिकवण्यासाठी चार चेंबर्स बांधणार

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १७ :** कृत्रिम फळ पिकवण्याच्या आधुनिक सुविधांचा अभाव लक्षात घेता, कृषी विभागाने म्हापसा मार्केट यार्डमध्ये दररोज ६० टन क्षमतेचे चार रिपनिंग चेंबर्स' उभारण्याचे काम सुरू केले आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए ) सूचनेनंतर हा निर्णय घेण्यात आला असून, प्रकल्प **गणेश चतुर्थीपूर्वी पूर्ण होण्याची शक्यता आहे.

कृषी संचालक संदीप फळ देसाई यांनी हेराल्ड मिडियाला दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील प्रत्येक तालुक्यात शास्त्रोक्त पद्धतीने फळे पिकवण्यासाठी आधुनिक कक्ष असणे अत्यावश्यक आहे. आम्ही गोवा कृषी उत्पन्न व पशुधन विपणन मंडळाच्या अंतर्गत असलेल्या जागांवर अशी पिकवणी केंद्रे उभारण्याचे काम हाती घेतले आहे.

त्यांनी स्पष्ट केले की, म्हापसा परिसरात तपासणीदरम्यान लक्षात आले की फळे अतिशय अस्वच्छ व अपारंपरिक पद्धतीने पिकवली जात आहेत. काही प्रकरणांमध्ये हानिकारक रसायनांचाही वापर होत असल्याचे आढळून आले. यानंतर एफडीएने अनेक छापे टाकले आणि संबंधित मंडळाला पिकवणी कक्षाची तातडीने आवश्यकता असल्याचे कळवले.

त्यानुसार, ई–निविदा प्रक्रिया राबवण्यात आली असून, प्रत्येकी १५ टन क्षमतेचे चार कक्ष बांधले जात आहेत. सध्या म्हापसा बाजारात दररोज सुमारे ८ ते १० टन केळी येतात, तर सणासुदीच्या काळात हे प्रमाण १५ टनांवर जाते. ही वाढती मागणी लक्षात घेऊन ही सुविधा आकार घेत आहे.

काम वेळेत पूर्ण झाले, तर हे चारही कक्ष गणेश चतुर्थीच्या आधी वापरासाठी सज्ज असतील, असेही फळ देसाई यांनी सांगितले. या प्रकल्पासाठी अंदाजे २ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे, ज्यापैकी ३५ टक्के केंद्र सरकारकडून व उर्वरित राज्य सरकारकडून निधी दिला जाईल.

गेल्या नऊ महिन्यांत उत्तर व दक्षिण गोव्यात ८० तपासणीत सुमारे ३५० आस्थापनांची तपासणी करण्यात आली आहे. एफडीए च्या वरिष्ठ अधिकाऱ्यानुसार, दक्षिण गोव्यात तीन कृत्रिम पिकवणी कक्ष कार्यरत असून, उत्तर गोव्यात एकही असा कक्ष नव्हता.

म्हापसा सब यार्डमधील घाऊक फळ विक्रेत्यांकडून गेल्या अनेक वर्षांपासून आधुनिक पिकवणी कक्षाची मागणी करण्यात येत होती. राज्यातील पान २ ▶